सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
दूरध्वनी क्र.
022 -28769391
E-mail:
bangurnagarpolicestation@gmail.com

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
बांगुर नगर लिंक रोड पोलीस ठाणे, मुंबई यांचे कार्यालय,
एम.टी. एन. एल बिल्डींग, माईंडस्पेस, एमडीपी क्रिक रोड,
मालाड (प), मुंबई 400064

ps.bangurnagar.mum@mahapolice.gov.in

**" प्रेसनोट "** दि- 11/03/2026

## बांगुरनगर पोलीस ठाणेकडून बसस्टॉपवरील मोबाईल चोरी करणारे आरोपी अटक करुन 04 गुन्हे उघड केल्याबाबत......

बांगुरनगर पोलीस ठाणे येथे फिर्यादी श्रीमती. मिनाक्षी योगेश मोरे वय 33 वर्षे, व्यवसाय-अंगणवाडी शिक्षिका, रा.ठी- छत्रपती वसाहत, भगतसिंग नगर नं.03 गोरेगाव प. मुंबई यांनी दिलेल्या तक्रारिवरुन गु.र.क्र.- 150/2026 कलम 303(2)भा.न्या.सं 2023 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आल आहे.

**गुन्हयाची थोडक्यात हकीकत**- फिर्यादी हया दिनांक 28/02/2026 रोजी सकाळी 08.30 वा. ते 08.45 वा. सुमारास ओशिवरा बस डेपो, दक्षिणवाहिणी लिंक रोड, गोरेगाव प. मुंबई, येथुन बस क्र. 464 मध्ये बसताना त्यांच्या काळ्या रंगाच्या पर्समधून एका अज्ञात चोरट्याने पर्समध्ये ठेवलेला रेडमी 14 पर्पल रंगाचा मोबाईल फोन ज्याची किंमत 6000 रु फिर्यादी यांच्या पर्समधून परवानगीशिवाय, लबाडीच्या इराद्याने चोरुन नेला. अशा तक्रार वरुन बांगुरनगर लिंकरोड पोलीस ठाणे येथे गु.र.क्र 150/2026 कलम 303(2), भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**तपास** - सदर गुन्हयाच्या तपासादरम्यान घटनास्थळावरील शासकीय सी.सी.टी.व्ही फुटेज तपासले असता सदर फुटेज मध्ये दिसणारा संशयीत इसम रेकार्डवरील श्रीकांत प्रविणचंद दामानी हा असल्याचे प्रथमदर्शनी दिसत असल्याने त्याचा त्याच्या राहत्या पत्त्यावर जावुन शोध घेतला असता तो मिळुन आला. त्यास पोलीस ठाणेस आणुन त्याचे नाव व गाव विचारले असता त्याने त्याचे नाव श्रीकांत प्रविणचंद दामानी वय 55 वर्षे , धंदा-व्यवसाय, रा.ठी- सर.जे.पी.स्कुल जवळ, अनतवाडी, साईबाबा मंदीराजवळ, खारोडी, मार्वे रोड, मालवणी, मालाड प, मुंबई असे सांगितले.त्याला गुन्हयाबाबत विचारणा केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले आरोपीचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने तसेच गुन्हयातील मुददेमाल आरोपीकडुन हस्तगत करणे असल्याने नमुद गुन्हयात त्यास अटक करण्यात आली आहे.तसेच त्याचा साथिदार आलम नजिर खान वय ४० वर्षे, धंदा-भंगार खरेदी, रा.ठी घोडदेव नाका येथील फुटपाथ, नवघर रोड, भाईदर, जि-ठाणे. गावचा पत्ता-ईमलिया खागर, तालुका-तुलशीपुर, पो. स्टे-पेछडना, जि-बलरामपुर, राज्य उत्तरप्रदेश याला साफळा रचुन अटक करण्यात आली आहे.

**अटक आरोपी** – 1)श्रीकांत प्रविणचंद दामानी वय 55 वर्षे, धंदा-व्यवसाय, रा.ठी- सर.जे.पी.स्कुल जवळ, अनतवाडी, साईबाबा मंदीराजवळ, खारोडी, मार्वे रोड, मालवणी, मालाड प, मुंबई
2) आलम नजिर खान वय ४० वर्षे, धंदा-भंगार खरेदी, रा.ठी घोडदेव नाका येथील फुटपाथ, नवघर रोड, भाईदर, जि-ठाणे. गावचा पत्ता-ईमलिया खागर, तालुका-तुलशीपुर, पो. स्टे-पेछडना, जि-बलरामपुर, राज्य उत्तरप्रदेश मो.क्र.

Scanned with OKEN Scanner

अटक आरोपी यांचेकडे अधिकचा तपास केला असता आरोपी कडुन खालील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले आहेत.
बांगुरनगर पोलीस ठाणे

1) गु.र.क्र.- 414/2025 कलम 303(2)भा.न्या.सं 2023
2) गु.र.क्र.- 141/2026 कलम 303(2)भा.न्या.सं 2023

बारिवली रेल्वे पोलीस ठाणे

1) गु.र.क्र.- 1258/2025 कलम 303(2)भा.न्या.सं 2023

आरोपी श्रीकांत प्रविणचंद दामानी आरोपीताचा पुर्व गुन्हे अभिलेख तपासला असता तो खालीलप्रमाणे मिळुन आला.
1) डी.बी.मार्ग पोलीस ठाणे -
1) गु.र.क्र. 12/2008, कलम 379, 34 भा.द.वि
2) बोरीवली पोलीस ठाणे -
1) गु.र.क्र. 128/2010, कलम 380 भा.द.वि
2) गु.र.क्र. 57/2012, कलम 379 भा.द.वि
3) भोईवाडा पोलीस ठाणे -
1) गु.र.क्र. 263/2010, कलम 379, 34 भा.द.वि
2) गु.र.क्र. 184/2012, कलम 379, 34 भा.द.वि
4) दिंडोशी पोलीस ठाणे -
1) गु.र.क्र. 84/2010, कलम 498(अ), 406, 34 भा.द.वि
5) मेघवाडी पोलीस ठाणे -
1) गु.र.क्र. 28/2013, कलम 174(अ) भा.द.वि
6) कांदिवली पोलीस ठाणे-
1) गु.र.क्र. 754/2024, कलम 379, 34 भा.द.वि.
7) पायधुनी पोलीस ठाणे -
1) गु.र.क्र. 268/2016, कलम 379 भा.द.वि
8) एम.आय.डी.सी पोलीस ठाणे - 1) गु.र.क्र. 647/2025, कलम 303(2) भा.न्या.सं

अटक आरोपी हे किरकोळ संघटीत गुन्हेगारीचे सदस्य असल्याचे तपासात निष्पन्न झाले असुन आरोपी विरुद्द कलम 112 भा.न्या.स.2023 अन्वये वाढ करण्यात आली आहे.

सदरची कारवाई मा.अपर पोलीस आयुक्त उत्तर प्रादेशिक विभाग मुंबई, मा. संदीप जाधव पोलीस उप आयुक्त परिमंडळ 11 मुंबई, मा.सहायक पोलीस आयुक्त गोरेगाव विभाग मुंबई, मा. रविंद्र आव्हाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बांगुर नगर पोलीस ठाणे मुंबई व मा.युवराज दळवी पोलीस निरीक्षक (गुन्हे) बांगुरनगर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि योगेश रंधे व गुन्हे प्रकटीकरण पथकाने केली आहे.

Scanned with OKEN Scanner